मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.in » पुणे, पिंपरी-चिंचवड » रविवार, दिनांक १० सप्टेंबर २०२३। पान १

# एकच मिशन, मराठा आरक्षण!

## सर्व राजकीय पक्ष आणि संघटनांचा मोर्चात सहभाग

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्सप्रेस मराठी ।**

सकल मराठा मोर्चा आणि मराठा बांधवांच्या वतीने आज (दि.९) पिंपरी चिंचवड शहरात मोर्चा काढण्यात आला. यामध्ये शहरातील सर्व राजकीय पक्ष आणि विविध संघटनांनी सहभाग घेतला होता. मराठा समाजाला आरक्षण देण्याची मागणी यावेळी सर्वांच्या वतीने करण्यात आली. तसेच जालना जिल्ह्यात मराठा आंदोलना दरम्यान झालेल्या लाठीहल्ल्याचा यावेळी उपस्थितांनी निषेध व्यक्त केला. या आंदोलनासाठी विविध राजकीय पक्ष, सामाजिक संघटनांच्या वतीने पाठिंबा देण्यात आला. यावेळी भाजप शहराध्यक्ष आमदार महेश लांडगे, माजी आमदार विलास लांडे, गौतम चाबुकस्वार, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे, काँग्रेसचे शहराध्यक्ष कैलास कदम, मनसे शहराध्यक्ष सचिन चिखले, शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे शहराध्यक्ष सचिन भोसले,




ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते मानव कांबळे, मारुती भापकर तसेच विविध राजकीय पक्ष, सामाजिक संस्थांचे पदाधिकारी, माजी नगरसेवक यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आमदार महेश लांडगे म्हणाले, मराठा समाजाच्या मागण्यांसाठी आम्हाला जे करावे लागेल ते आम्ही करत आहोत. यापुढेही करत राहू. मराठा मूक मोर्चा पासून आम्ही या आंदोलनाशी जोडलो आहोत. मराठा समाजाला न्याय मिळवून देण्याचा माझा कायम प्रयत्न राहील.

मराठा महासंघाचे अध्यक्ष प्रकाश जाधव म्हणाले, मागील चाळीस वर्षांपासून मराठा समाज आरक्षणासाठी आंदोलन करीत आहे. मराठा समाजाचे ५८ मूक मोर्चा राज्यभरात ठिकठिकाणी निघाले. या आंदोलनाला आजवर कुठेही गालबोट लागले नव्हते. पण जालना येथे आंदोलकांवर पोलिसांनी लाठीचार्ज केला आणि आजवरच्या आंदोलनाला प्रथमच गालबोट लागले. या प्रकरणाची न्यायालयीन चौकशी करावी आणि दोषींवर कारवाई करावी. आरक्षणाबाबत दोन समाजात तेढ निर्माण केली जात आहे. मात्र कुणीही अशा प्रकारात वाद घालू नये. मराठा समाजाला कुणाच्याही हिश्याचे आरक्षण नको आहे. मराठा समाजाला ओबीसी वर्ग दोन करून समाजाच्या टक्केवारी प्रमाणे अर्धे टक्के आरक्षण द्यावे. मराठा समाजाला नोकरी आणि शिक्षणासाठी आरक्षणाची गरज आहे. राजकारण्यांनी मतांचे गणित न पाहता समाजाची गरज लक्षात घ्यावी. गरीब आणि गरजू मराठा बांधवांची आरक्षण नसल्याने मोठी हानी होत असल्याचे शिरीष देवरे यांनी सांगितले. राष्ट्रवादीचे विलास लांडे यांनी देखील मराठा समाजाला आरक्षण देण्याची मागणी केली. भाजपचे एकनाथ पवार म्हणाले, मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र द्यायला हवे. या मागणीसाठी हे आंदोलन केले जात आहे. हे आंदोलन कुठल्याही पक्षाचे नाही तर सर्वसामान्य मराठा समाजाचे आहे. प्रसंगी राजकीय पक्षाचा राजीनामा देईन पण मराठा समाजाच्या मागण्यांसाठी कायम कार्यरत राहीन. मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र द्यावे आणि ओबीसी मध्ये समाविष्ट करून घ्यावे, असे मत संभाजी ब्रिगेडचे प्रवीण कदम यांनी मांडले. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे सचिन भोसले म्हणाले, शासनाने मराठा आरक्षणाच्या बाबतीत अनाजी पंत प्रमाणे भूमिका घेतली आहे. ती खपवून घेतली जाणार नाही. मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी या आंदोलनाला शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने जाहीर पाठिंबा देण्यात येत आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे म्हणाले, मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी आम्ही सकारात्मक आहोत. शासनाने यातील सर्व बाबी पडताळून आरक्षण जाहीर करावे, अशी भूमिका यावेळी मांडली. आंदोलनाच्या ठिकाणी अनेक राजकीय पुढारी जातात. फोटो काढतात आणि निघून जातात. ही भूमिका खपवून घेतली जाणार नसल्याचे नाना जावळे यांनी सांगितले.

# एक्सप्रेस गाड्यांना चिंचवड स्थानकात थांबा देणे गरजेचे!

## रेल्वे प्रवाशांच्या विविध मागण्यांबाबत रेल्वे विभागाला निवेदन

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्सप्रेस मराठी।**

पिंपरी-चिंचवड शहरातील रेल्वे प्रवाशांच्या विविध मागण्यांबाबत (उहळपलहुरव) रेल्वे प्रवासी संघ पिंपरी-चिंचवड (पुणे) यांच्या वतीने रेल्वेच्या पुणे विभागाच्या मुख्य व्यवस्थापक इंदुमती दुबे यांना निवेदन देण्यात आले. त्यात प्रगती एक्सप्रेसला चिंचवड येथे थांबा देणे, सिंहगड एक्सप्रेसला पासधारक महिलांसाठी व्यवस्था करावी. अर्धी बोगी पास धारकांसाठी राखीव ठेवावी. दुपारच्या वेळेत पुणे-लोणावळा मार्गावर लोकल सुरू करावी. डेक्कन क्वीन एक्सप्रेस व इतर पुणे मुंबई धावणाऱ्या एक्सप्रेसमध्ये पासधारकांसाठी राखीव डब्यांमध्ये नियमित तपासणी व्हावी, अशा विविध मागण्या करण्यात आल्या आहेत. इंदुमती दुबे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत बशीर सुतार यांनी निवेदन दिले. यावेळी डॉ. मिलिंद हिरवे, सीनियर डीसीएम स्वप्निल नीला, सीनियर डिव्हिजन ऑपरेशन्स तसेच डीआरयुसीसी सदस्य श्रीयुत माने, श्रीयुत काची, श्रीयुत बियाणी, इक्बाल भाईजान



मुलाणी, श्रीयुत बटाला, श्रीयुत चौगुले, आप्पासाहेब शिंदे आदी उपस्थित होते. पुणे-मुंबई-पुणे दरम्यान धावणाऱ्या प्रगती एक्सप्रेस (१२१२५/१२१२६) ला पुणे स्थानकानंतर थेट लोणावळा येथे थांबा आहे. या गाडीला शिवाजीनगर ते लोणावळा दरम्यानच्या प्रवाशांना कनेक्टेड लोकल नाही. यामुळे या गाडीने प्रवास करणाऱ्या प्रवाशांना पुणे येथून ६.३० ला सुटणारी लोकल पकडावी लागते आणि तासभर लोणावळा स्टेशन येथे ताटकळत थांबावे लागते. यामुळे प्रवाशांचा मोठ्या प्रमाणात वेळ वाया जातो आणि त्यांना मनस्ताप सहन करावा लागतो. पुणे शहरालगत असणारे पिंपरी-चिंचवड शहर हे मोठे औद्योगिक नगर असून त्याची लोकसंख्या सुमारे चाळीस लाख इतकी आहे. पिंपरी-चिंचवड शहरातून दररोज हजारो प्रवासी मुंबईच्या दिशेने प्रवास करतात. सकाळी सिंहगड एक्सप्रेस गेल्यानंतर मुंबईला जाणारी दुसरी गाडी सुमारे दहा तासांनंतर म्हणजे दुपारी ४.१५ ला कोयना एक्सप्रेस ही आहे. यामुळे १० तासांच्या या मधल्या कालावधीत लांब पल्ल्याच्या मेल/एक्सप्रेस गाड्यांना चिंचवड स्थानकात थांबा देणे अत्यंत गरजेचे आहे. तसेच, पिंपरी-चिंचवड येथील प्रवाशांचा त्रास कमी करण्यासाठी आणि त्यांना एक चांगली सुविधा देण्याकरिता प्रगती एक्सप्रेसला चिंचवड स्थानकात थांबा देण्यात यावा.

# इंदिरा इन्स्टिट्यूटमध्ये ३० वा एमबीए इंडक्शन सोहळा संपन्न!

## तीसावा सोहळा म्हणजे या समर्पणाचाच पुरावा : चंद्रकात पाटील

**वाकड । न्यूज एक्सप्रेस मराठी।** नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरणावरही प्रकाश टाकला. हे शैक्षणिक धोरण विद्यार्थी तसेच शिक्षण संस्थांसाठी क्रांतिकारी ठरेल व स्पर्धात्मक जागतिक पातळीवर ठाम उभे राहण्यासाठी दिशादर्शक ठरेल त्यामुळे विद्यार्थी हा शैक्षणिक व्यवस्थेत केंद्रस्थानीच असला पाहिजे असे आग्रहाचे प्रतिपादन राज्याचे उच्च आणि तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी ताथवडे येथे केले. इंदिरा ग्रुप ऑफ इन्स्टिट्युटचा ३० वा परिचय सोहळा चंद्रकात पाटील यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. यावेळी उच्च शिक्षणाचे महत्त्व विशद करताना अतिथीय भाषणात ते बोलत होते. यावेळी कॅस्ट्रॉल समुहाच्या सास्वती पानिग्रही, श्री चाणक्य शिक्षण समूहाच्या अध्यक्षा डॉ. तरिता शंकर तसेच संचालक, प्राचार्य व सर्व प्राध्यापकवृंद उपस्थित होते. पुढे ते म्हणाले, वेगाने विकसित होणाऱ्या जगात इंदिरा ग्रुप दीर्घकाळापासून शैक्षणिक वाटचालीत विद्यार्थ्यांच्या सर्वोत्कृष्ट वृद्धीसाठी वचनबद्ध आहे. हा तीसावा सोहळा म्हणजे या समर्पणाचाच पुरावा आहे असे कौतुक केले. इंदिरा ग्रुप ऑफ इन्स्टिट्युटच्या परंपरेला साजेशा सोहळ्यात विद्यार्थ्यांना शैक्षणिक वाटचालीतील आव्हाने आणि संधी यांचे मार्गदर्शन उपस्थित मान्यवरांनी केले. इंदिरा संस्थेत दरवर्षी होणाऱ्या या परिचय सोहळ्यापासुनच पाचशेहून अधिक विद्यार्थी त्यांच्या येणाऱ्या शैक्षणिक वर्षाची व परिवर्तनशील प्रवासाची सुरुवात करतात. याला एक मोठी परंपरा आहे, जी विद्यार्थ्यांना प्रतिष्ठित प्राध्यापक सदस्य, समर्पित कर्मचारी आणि मान्यवरांसोबत गुंतण्यासाठी एक अनोखे व्यासपीठ प्रदान करते जे त्यांच्या शैक्षणिक अनुभवाला आकार देण्यात महत्वाची भूमिका बजावतात.



### परिवर्तनशील प्रवासाची सुरुवात

» वेगाने विकसित होणाऱ्या जगात इंदिरा ग्रुप दीर्घकाळापासून शैक्षणिक वाटचालीत विद्यार्थ्यांच्या सर्वोत्कृष्ट वृद्धीसाठी वचनबद्ध आहे. हा तीसावा सोहळा म्हणजे या समर्पणाचाच पुरावा आहे असे कौतुक केले. इंदिरा ग्रुप ऑफ इन्स्टिट्युटच्या परंपरेला साजेशा सोहळ्यात विद्यार्थ्यांना शैक्षणिक वाटचालीतील आव्हाने आणि संधी यांचे मार्गदर्शन उपस्थित मान्यवरांनी केले. इंदिरा संस्थेत दरवर्षी होणाऱ्या या परिचय सोहळ्यापासुनच पाचशेहून अधिक विद्यार्थी त्यांच्या येणाऱ्या शैक्षणिक वर्षाची व परिवर्तनशील प्रवासाची सुरुवात करतात.

# नागरिक आणि महापालिका यांच्या समन्वयातून ऑक्सिजन पार्कची उभारणी

## एक आदर्श प्रकल्प कार्यान्वित झाल्याची भावना

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्सप्रेस मराठी।** निगडी प्राधिकरणातील पेठ क्रमांक २६, आकुर्डी दूरध्वनी केंद्रासमोर उभारण्यात आलेले ऑक्सिजन पार्क म्हणजे पर्यावरणाविषयी जागरूक नागरिक आणि पिंपरी – चिंचवड महापालिका यांच्यातील समन्वयाचा उत्तम वस्तुपाठ म्हणता येईल. २०१८ सालापासून माजी नगरसेविका शर्मिला बाबर आणि अन्य लोकप्रतिनिधी तसेच ऑक्सिजन पार्क रेसिडेन्स असोसिएशन ही सेवाभावी संस्था यांनी आकुर्डी दूरध्वनी केंद्रासमोर असलेला ०.६१ हेक्टर क्षेत्रफळाचा भूखंड महानगरपालिकेत हस्तांतरित करण्यात यावा म्हणून सातत्याने पाठपुरावा केला होता. शनिवार, दिनांक ०९ सप्टेंबर २०२३ रोजी सकाळी आठ वाजता या नियोजित ऑक्सिजन पार्कमध्ये सुमारे २१६ देशी वृक्षांचे रोपण करण्यात आले. पिंपरी – चिंचवड महापालिका उद्यान आणि जनसंपर्क उपायुक्त रविकिरण घोडके, सहउद्यान अधीक्षक राजेश वसावे, उद्यान पर्यवेक्षक संदीप गायकवाड, माजी उपमहापौर शैलजा मोरे, माजी नगरसेविका शर्मिला बाबर, माजी नगरसेवक अमित गावडे, माजी नगरसेवक राजू मिसाळ, सामाजिक कार्यकर्ते राजेंद्र बाबर, पर्यावरणप्रेमी धनंजय शेडबाळे, ऑक्सिजन पार्क रेसिडेन्स असोसिएशनचे अध्यक्ष विजय नाईक, उपाध्यक्ष जयकुमार गुजर, सचिव धनंजय कदम, सदस्य सोनलकुमार सिंगी, विश्वजित हरूगडे, प्रशांत शेजवळ, हनुमंत रेडकर, देवेंद्र खडसे, संतोष मोरे यांच्यासह परिसरातील नागरिकांनी या वृक्षारोपणात सहभाग घेतला. अतिक्रमण आणि विध्वंसक प्रवृत्तींना आळा घालण्यासाठी ऑक्सिजन पार्कच्या सभोवताली सीमाभिंती उभारण्यात आलेल्या असून वृक्षारोपणासाठी फुलपाखरे आणि पक्षी आकर्षित होतील; तसेच प्राणवायूचे जास्तीत जास्त प्रमाणात उत्सर्जन करतील अशा वृक्षांची निवड करण्यात आलेली आहे. शहरीकरणामुळे वाढत्या प्रदूषणाला आळा घालणे आणि पर्यावरणाचे संवर्धन करणे या उद्देशाने परिसरातील विविध गृहरचना संस्थांमधील जागरूक नागरिक एकत्र आले. त्यांनी नाशिक आणि अन्य ठिकाणी असलेल्या ऑक्सिजन पार्कांना भेटी देऊन, अभ्यास करून प्रकल्पाची मागणी केली. त्याला लोकप्रतिनिधी आणि पिंपरी – चिंचवड महानगरपालिकेच्या आयुक्त, उपायुक्त यांच्यासह सर्वांनी सहकार्य केल्यामुळे एक आदर्श प्रकल्प कार्यान्वित झाल्याची भावना उपस्थिती नागरिकांनी यावेळी व्यक्त केली.

# लम्पीच्या पार्श्वभूमीवर ५५ टक्के जनावरांचे लसीकरण

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्सप्रेस मराठी।** लम्पीचा वाढता प्रादुर्भाव रोखण्यासाठी महापालिकेच्या वतीने विशेष पथकांद्वारे लसीकरण, उपचार, पशुपालकांमध्ये जनजागृती आणि मार्गदर्शक सुचनांची अंमलबजावणी करण्यात आली असून शहरातील ५५ टक्के जनावरांचे लसीकरण ९ दिवसांत पूर्ण करण्यात आले आहे. येत्या काही दिवसांतच शहरातील १०० टक्के जनावरांचे लसीकरण पुर्ण करण्याचे उद्दिष्ट्य महापालिकेने निश्चित केले आहे, अशी माहिती आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी दिली आहे. लम्पी आजाराचा प्रसार रोखण्यासाठी पशुवैद्यकीय विभागाने राज्य पशुसंवर्धन विभागाकडून गोटपॉक्स लसीचे ३ हजार ४०० डोस उपलब्ध करून घेतले असून आणखी डोस उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे. सध्या लसीकरण प्रक्रिया जलद गतीने सुरु असून २४४० जनावरांचे लसीकरण पूर्ण करण्यात आले आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रात गाय व बैलांमध्ये लम्पी त्वचा आजाराचा प्रसार होत असल्याचे दिसून आले होते. जनावरांना वेळोवेळी उपचाराच्या सुविधा देण्याच्या अनुषंगाने ३० ऑगस्ट रोजी पशुवैद्यकीय पथकांची नेमणूक करण्यात आली असून शहरातील विविध भागात लम्पी आजाराचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी आयुक्त सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली विविध उपाययोजना राबविण्यात येत आहेत, अशी माहिती अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांनी दिली आहे.

# अजित दादांनी टोचले शिक्षकांचे कान!

## बारामतीचा निकाल शून्यच; आता का कपाळ फोडावं?

पुणे। न्यूज एक्स्प्रेस मराठी। उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बारामतीतील शिक्षकांचे चांगलेच कान टोचले आहेत. शिष्यवृत्तीच्या परिक्षेत बारामतीच्या विद्यार्थ्यांचा निकाल शून्य टक्के लागल्यामुळे त्यांनी आज संतप्त प्रतिक्रिया दिली. तर शिक्षकांचे चांगलेच कान टोचले. त्यांच्या खुमासदार शैलीत त्यांनी आज मी काय डोकं फोडून घेऊन का, एवढी मरमर करतो, तरी देखील बारामतीतील विद्यार्थ्यांचा शिष्यवृत्तीतील निकाल शून्य लादल्याने शिक्षकांचे कान टोचले आहेत. अजित पवार पुढे बोलताना म्हणाले की, आम्ही येथे जिल्ह्यासाठी व राज्यासाठी मरमर काम करतो. आता काय कपाळ फोडून घेऊ का? एवढं सगळं करुनही बारामतीचा निकाल शून्यच आहे. आज अल्पबचत भवन येथे आयोजित जिल्हा शिक्षक पुरस्कार आणि अध्यक्ष चषक पुरस्कार वितरण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी त्यांनी शिक्षकांची कानउघाडणीच केली. अजित पवार पुढे म्हणाले की, आपल्या मुलांना कुठे शिकवायचं हा प्रत्येक पालकाचा अधिकार आहे. त्यामुळे त्यात जाण्यात काही अर्थ नाही. आज गुणवत्ता सुधारण्याच्या दृष्टिकोनातून अनेक गोष्टी घडत आहेत. पहिलीपासून इंग्रजी सुरू झालं. या अगोदर पाचवीपासून होतं. कालानुरूप बदल केला जातो. बदल करण्याची प्रक्रिया सुरू असते. शिष्यवृत्तीमध्ये अनेक शाळाचा चांगला निकाल लागला आहे, तर काही शून्य लागला आहे. शिक्षण देण्यासाठी हवं ते दिलं जाईल. मात्र शिक्षण नीट द्या, अशा शब्दांत त्यांनी शिक्षकांना सल्ला दिला आहे. लातूर पॅटर्न शिक्षकांमुळे प्रसिद्ध असल्याचंही ते म्हणाले. पाचवीचा शिष्यवृत्तीचा निकाल लागला आहे. या परीक्षेत ६४० विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. त्यात शिरूरची मुले जास्त आहेत. त्यानंतर खेडची मुलं आहेत आणि त्यानंतर सातव्या क्रमांकावर बारामती आहे. पुरंदर तालुक्यातील एका मुलाने अब्रू राखली आहे. शिरुरच्या पोरांनी बाजी मारली आहे. मात्र बारामती, भोर आणि हवेलीचा निकाल शून्य टक्के आहे. आता काय कपाळ फोडून घेऊ का? आम्ही सकाळी सहा वाजल्यापासून मरमर काम करतो आणि बारामतीचा निकाल शून्य, असं म्हणत ते शिक्षकांवरच भडकले.



### काही शाळांचा निकाल चांगला पण..

» अजित पवार पुढे म्हणाले की, आपल्या मुलांना कुठे शिकवायचं हा प्रत्येक पालकाचा अधिकार आहे. त्यामुळे त्यात जाण्यात काही अर्थ नाही. आज गुणवत्ता सुधारण्याच्या दृष्टिकोनातून अनेक गोष्टी घडत आहेत. पहिलीपासून इंग्रजी सुरू झालं. या अगोदर पाचवीपासून होतं. कालानुरूप बदल केला जातो. बदल करण्याची प्रक्रिया सुरू असते. शिष्यवृत्तीमध्ये अनेक शाळाचा चांगला निकाल लागला आहे, तर काही शून्य लागला आहे. शिक्षण देण्यासाठी हवं ते दिलं जाईल. मात्र शिक्षण नीट द्या, अशा शब्दांत त्यांनी शिक्षकांना सल्ला दिला आहे. लातूर पॅटर्न शिक्षकांमुळे प्रसिद्ध असल्याचंही ते म्हणाले.

### पालकमंत्र्यांना अप्रत्यक्ष टोला

» 'लवकर वेळेवर उठायला शिका आणि कार्यक्रमाला वेळेत जायला शिका', असा सल्ला उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विद्यार्थी आणि शिक्षकांना दिला असला तरी या विधानांतून त्यांनी उशिरा येणाऱ्या पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांना अप्रत्यक्ष टोला लगावल्याची चर्चा शनिवारी रंगली. 'दादा बोलले त्याला मी फक्त मम म्हटले तरी पुरेसे ठरे, अशी सारवासारव करीत पाटील यांनी वेळ मारुन नेली. पुणे जिल्हा परिषदेच्या वतीने जिल्हा परिषद आदर्श शिक्षक पुरस्कार कार्यक्रमासाठी शनिवारी अजित पवार वेळेत पोहचले. परंतु पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांना पोहोचण्यास अशीर झाला. त्यामुळे अजित पवार यांनी नाराजी व्यक्त करत, आपल्या भाषणात उपदेशाचे सल्ले दिले. पवार यांचे भाषण सुरु असतानाच पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांचे व्यासपीठावर आगमन झाले आणि विद्यार्थ्यांना सल्ला देण्याच्या भूमिकेतून अजितदादांनी पालकमंत्र्यांना चिमटा काढला. पवार म्हणाले, राजकारण करताना माझाही शिक्षण संस्थाशी संबंध येत असून संस्थांमध्ये काम करण्याचा अनुभव आहे. राज्य शासन शिक्षणावर ८० हजार कोटी रुपये खर्च करते. ज्ञान संपादन करणे महत्त्वाचे असून शिक्षकांचे यश हे त्यांच्या कामगिरीवर अवलंबून असते.

# वाहतूककोंडी होणाऱ्या २८ ठिकाणांचे सर्वेक्षण!

## पुण्यातील वाहतूककोंडी सोडविण्याच्या दिशेने पाऊल

पुणे। न्यूज एक्स्प्रेस मराठी। शहरातील वाहतूककोंडी सोडविण्यासाठी प्रादेशिक परिवहन कार्यालयाने (आरटीओ) इतर विभागांसोबत नुकतेच सर्वेक्षण केले. शहरात वाहतूककोंडी होणारी २८ ठिकाणे आहेत. या ठिकाणी अनेक महत्त्वाच्या उपाययोजना सुचविण्यात आल्या आहेत. त्यात दगडूशेठ हलवाई गणपती मंदिरात जाणाऱ्या भाविकांसाठी पादचारी मार्ग तयार करण्यासह इतर अनेक उपाययोजनांचा समावेश आहे. प्रादेशिक परिवहन कार्यालयाने पुणे महापालिका, वाहतूक पोलीस, सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्यासोबत पुण्यातील कोंडीच्या ठिकाणाचे पोलीस ठाणेनिहाय सर्वेक्षण केले होते. त्यात वाहतूककोंडी होणाऱ्या २८ ठिकाणांचे सर्वेक्षण करण्यात आले. या ठिकाणी होणारी कोंडी सोडविण्यासाठी आरटीओने उपाययोजनांचा अहवाल तयार केला. या अहवालात शहरातील प्रत्येक पोलीस ठाण्याच्या हद्दीतील कोंडीचे ठिकाण आणि तिथे करावयाच्या उपाययोजना यांची माहिती देण्यात आली. शहराच्या मध्यवर्ती भागात फरासखाना पोलीस ठाण्याच्या हद्दीत दगडूशेठ हलवाई गणपती मंदिरात जाणाऱ्या भाविकांसाठी स्वतंत्र पादचारी मार्ग करण्याची सूचना करण्यात आली आहे. गाडीतळ चौकात नो एंट्रीचा फलक लावणे, कसबा चौक ते शनिवारवाडा वेग नियंत्रित करणे अशाही सूचनांचा समावेश आहे. डेक्कन पोलीस ठाण्याच्या हद्दीत आपटे रस्त्यावर सिग्नल बसवावा आणि डेक्कन बस थांबा परिसर नो-पार्किंग क्षेत्र घोषित करावे, असे अहवालात नमूद करण्यात आले आहे. दत्तवाडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत गजाननमहाराज चौकात फेरीवाल्यांना मनाई करणे, बिबवेवाडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत दळवी चौकात एकेरी वाहतूक करणे, शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत साखर संकुलासमोर रस्त्यावर उभ्या असलेल्या वाहनांवर कारवाई करणे, स्वारगेट पोलीस ठाण्याच्या हद्दीत स्वारगेट बस स्थानकासमोर गतिरोधक बसविणे, कोंढवा पोलीस ठाण्याच्या हद्दीत खडी मशिन चौकातील विजेची डीपी हटवून तिथे उड्डाणपूल उभारणे यासह अनेक उपाय अहवालात सुचविण्यात आले आहेत.



"आरटीओने महापालिका, सार्वजनिक बांधकाम विभाग, वाहतूक पोलीस आणि राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण यांच्यासोबत कोंडीच्या ठिकाणांचे सर्वेक्षण केले. याबाबतचा अहवाल जिल्हाधिकाऱ्यांना सादर केला होता. जिल्हाधिकाऱ्यांनी पुन्हा एकदा सर्व विभागांना सोबत घेऊन सर्वेक्षण करण्यास सांगितले आहे. त्यानंतर अंतिम अहवाल तयार करून जिल्हाधिकाऱ्यांसमोर मांडला जाईल.

– संजीव भोर,
प्रभारी प्रादेशिक परिवहन अधिकारी

# मूल्यांकन न केलेल्या महाविद्यालयांवर कारवाई!

## उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांचे निर्देश

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।**

नॅक-नॅब मूल्यांकन न केलेल्या महाविद्यालयांवर आता थेट कारवाईचा बडगा उगारण्याचे निर्देश उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिले. नॅक मूल्यांकन न केलेल्या महाविद्यालयांना नोटिस द्यावी. दिलेल्या कालमर्यादेत प्रक्रिया पूर्ण न केलेल्या महाविद्यालयांचे पुढील काळात नवीन प्रवेश थांबविणे, प्रवेश संख्या कमी, मर्यादित करणे, तसेच त्यांची परीक्षा केंद्रे रद्द करणे अशी कारवाई करण्याबाबत पाटील स्पष्ट केले.

पाटील यांच्या अध्यक्षतेखाली सर्व विभागीय सहसंचालक यांची आढावा बैठक महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संस्था येथे झाली. त्यावेळी ते बोलत होते.

उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी, तंत्र शिक्षण संचालक डॉ. विनोद मोहितकर, उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रमोद येवले, विभागीय सह संचालक आदी उपस्थित होते.



विद्यापीठनिहाय संलग्न महाविद्यालये, त्यापैकी नॅक मानांकन प्राप्त महाविद्यालये यांची माहिती व आढावा घेण्यात आला. राज्यातील उच्च शिक्षणाचा दर्जा उंचावण्याच्या दृष्टीने सर्व महाविद्यालयांच्या नॅक मूल्यांकनासाठी विद्यापीठांनी पुढाकार घ्यावा. नॅक मूल्यांकनासाठी नोंदणी केलेल्या, मूल्यांकन प्राप्त आणि मूल्यांकन नसलेल्या महाविद्यालयांची माहिती, नावे विद्यापीठांनी संकेतस्थळावर अद्ययावत करून प्रसिद्ध करावी, तंत्रशिक्षण, औषधनिर्माण शास्त्राचे पदविका शिक्षण देणाऱ्या संस्थांनी राष्ट्रीय अधिस्वीकृती मंडळाकडून (एनबीए) मूल्यांकन करून घेणे आवश्यक असून त्यासाठी तंत्रशिक्षण विभागाने आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या सूचनाही पाटील यांनी दिल्या.

### महाविद्यालयांची माहिती...

**» उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी, तंत्र शिक्षण संचालक डॉ. विनोद मोहितकर, उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. सुरेश गोसावी, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. सुभाष चौधरी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. प्रमोद येवले, विभागीय सह संचालक आदी उपस्थित होते. विद्यापीठनिहाय संलग्न महाविद्यालये, त्यापैकी नॅक मानांकन प्राप्त महाविद्यालये यांची माहिती व आढावा घेण्यात आला.**

# दादा हे मुख्यमंत्री पदाचे उमेदवार!

## बारामती लोकसभा उमेदवार अजित दादाच ठरवतील

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नऊ वर्षाच्या कारकिर्दीत देश प्रगती पथावर जात आहे. आगामी निवडणुकीत एकत्रित निवडणुकीला महायुती मधील पक्ष सामोरे जातील. राज्यातील सर्व लोकसभा जागा जिंकण्याचा आमचा प्रयत्न असून बारामती लोकसभा मतदारसंघातून उमेदवार ठरविण्याचे काम उपमुख्यमंत्री अजित पवार करतील. अजित पवार हे मुख्यमंत्री पदाचे उमेदवार असल्याची राज्यातील जनतेची इच्छा आहे. तशा प्रकारची गुणवत्ता, क्षमता त्यांच्यात आहे, असे मत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी शनिवारी पत्रकार परिषदेत व्यक्त केले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते रमेश थोरात, प्रदीप गारटकर, प्रदीप देशमुख , बबनराव भेगडे ,सचिन घोटकुले उपस्थित होते. सुनील तटकरे म्हणाले की, कोल्हापूर मध्ये उद्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची सभा होणार आहे. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री अजित पवार हे श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती दर्शन घेऊन सभेला रवाना होतील. कराड मध्ये प्रीतीसंगम्म येथे देखील ते जाणार आहे. बीड सभे नंतर राज्यात लवसाने ओढ दिल्याने दुष्काळ सदृश्य परिस्थिती निर्माण झाली. परंतु सध्या खरीप पिका साठी दिलासादायक पाऊस होत आहे. मराठवाडा मध्ये मुक्ती संग्राम निमित्ताने बैठक होणार असून त्यात शेतकरी यांना दिलासा दिला जाईल. जळगाव मध्ये देखील गणपती नंतर सभा घेतली जाणार आहे. राज्यभरात अशाप्रकारे संघटन नियुक्ती करून सरकार योजना अमलबजावणसाठी प्रयत्न केले जाणार आहे. जनतेशी थेट संवाद आगामी निवडणूक अनुषंगाने करण्यात येणार आहे. विरोधक यांच्याकडून दिशाभूल केली जाते त्यामुळे आमची भूमिका थेटपणे नागरिकांना पोहचवले जात आहे. महायुती सरकारमध्ये आम्ही सहभागी झालो. सर्वोच्च न्यायलयाचे निकाल आणि कायदेशीर सल्ला घेऊन आम्ही सत्तेत सहभागी झालो आहे. आम्ही एक राजकीय भूमिका घेऊन सत्तेत सहभागी झालो. आमच्या निर्णयाची निवडणूक आयोगाला माहिती दिली आहे



### शेतकऱ्यांना दिलासा दिला जाईल

**» मराठवाडा मध्ये मुक्ती संग्राम निमित्ताने बैठक होणार असून त्यात शेतकरी यांना दिलासा दिला जाईल. जळगाव मध्ये देखील गणपती नंतर सभा घेतली जाणार आहे. राज्यभरात अशाप्रकारे संघटन नियुक्ती करून सरकार योजना अमलबजावणसाठी प्रयत्न केले जाणार आहे. जनतेशी थेट संवाद आगामी निवडणूक अनुषंगाने करण्यात येणार आहे. विरोधक यांच्याकडून दिशाभूल केली जाते त्यामुळे आमची भूमिका थेटपणे नागरिकांना पोहचवले जात आहे.**

# पाण्यासाठी महायुद्ध होण्याची शक्यता!

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।**

वाढती लोकसंख्या, कमी होत जाणारे कृषीक्षेत्र आणि भूजलाचा बेसुमार उपसा, यामुळे देशातील उपलब्ध जलसाठ्यांवर विपरीत परिणाम होत आहेत. शाश्वत विकासाचे ध्येय साध्य करण्याच्या मार्गात उपलब्ध जलसाठ्यांच्या नियमनाचे आव्हान असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्र वॉटर रिसोर्स रेग्युलेटरी अथॉराइजचे सेवानिवृत्त अध्यक्ष डॉ. संजय चहांदे यांनी केले. तसेच भविष्यात पाण्यावरून चौथे महायुद्ध होईल त्यासाठी पाण्याचा प्रत्येक थेंब महत्वाचा आहे आणि तो मौल्यवान आहे, याविषयी सर्व समाजघटकांत जाणीवजागृती अत्यावश्यक आहे. यातूनच पाणी,अन्न आणि उर्जासुरक्षेचे ध्येय साध्य करता येईल असे ते म्हणाले. ओम एल आय चॅप्टर, पुण्याच्या लॅम्ब्डा अल्फा इंटरनॅशनल (यूएसए) शी संलग्न सोसायटी फॉर लँड इकॉनॉमिक्स आणि एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित एक दिवसीय राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. ही राष्ट्रीय परिषद 'जलसंवर्धनाच्या माध्यमातून अन्न, सौरऊर्जा व पर्यावरण सुरक्षा' ही मध्यवर्ती संकल्पनेवर होती. याप्रसंगी कुलगुरू डॉ.आर.एम.चिटणीस, आर्किटेक्ट अनिलकुमार हाटकर, कोलंबो येथील आंतरराष्ट्रीय जल व्यवस्थापन संस्थेचे डॉ.तुषार शाह,ओम एल आयचे उपमहाप्रबंधक प्रकाश पाटील, जे. जे. कॉलेजचे प्रा. राजीव मिश्रा आणि स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स अँड कामर्सच्या अधिष्ठाता प्रा.डॉ.अंजली साने आदी उपस्थित होते. डॉ. चहांदे म्हणाले, पाणी मानवी अस्तित्वासाठी इतके अनिवार्य आहे की आपल्या अंतराळ मोहिमांचे एक ध्येय पाण्याचा शोध ही आहे. पृथ्वीवर पाण्याचे साठे विपुल असले तरी मानवोपयोगी जलसाठा मर्यादित आहे. उपलब्ध जलसाठे, अनियमित पाऊसमान, वाढती लोकसंख्या, औद्योगीकरणासाठी पाण्याची वाढती मागणी, अनियंत्रित भूजल उपसा या आव्हानांवर उपाय शोधण्यासाठी जलसाठ्यांवरील नियंत्रण आवश्यक आहे.